<u>प्रेसनोट</u>

**जा.क्र. कोजिप/साप्रवि/कावी/१२/जयंती/२०१७**
**सामान्य प्रशासन विभाग जि.प. कोल्हापूर**
**दिनांक २७ /११/२०१७**

**प्रति,**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**कोल्हापूर**

**विषयः- कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये संविधान दिन संपन्न व २६ /११ च्या मुंबईवरील हल्ल्यात शहीद झालेल्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.**

शासन परिपत्रक दिनांक २४ नोव्हेंबर २०१७ अन्वये दिनांक २७/११/२०१७ इ. रोजी जिल्हा परिषदमध्ये सकाळी ११.०० वाजता संविधान दिन साजरा करणेत आला.यावेळी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या राज्यघटनेच्या प्रास्तविकाचे सामुहिक वाचन करणेत आले. त्याप्रसंगी, मा. डॉ. कुणाल खेमनार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भारतीय संविधानाचे महत्व सांगितले. व श्री इंद्रजित देशमुख अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भारतीय संविधानाचे स्वरूप व संविधानाचे नागरिकांच्या जीवनातील महत्व सांगितले. यावेळी २६/११ च्या मुंबईवरील भ्याड अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्याना भावपूर्ण श्रध्दांजली वाहणेत आली.

त्याप्रसंगी डॉ.श्री. हरिषचंद्र जगताप ,प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,श्री. राजेद्र भालेराव उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. संजय राजमाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी , डॉ.श्री. प्रकाश पाटील जिल्हाआरोग्यधिकारी , श्री. सुभाष चौगुले शिक्षणाधिकारी ,श्री.चंद्रकांत सुर्यवंशी कृषिअधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बी.पी. माळवे यांनी केले , कक्षअधिकारी ,अधिक्षक, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

तरी सदरची बातमी आपले मार्फत जिल्हयातील लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करणेत यावी.

(सही/-राजेद्र भालेराव )
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र. )**
**जिल्हा परिषद कोल्हापूरकरीता**

